# प्रेसनोट पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण दिनांक 20 / 10 / 2023

| अ.क् | पो.स्टे.अप.क्र. कलम | फिर्यादीचे नाव | आरोपीचे नाव | घटनास्थळ | घटना.ता. वेळ | दाखल.ता. वेळ | हकिकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | परतवाडा 900/2023 कलम- 381, 411 भादवी | मोहम्मद वल्द हैदर अली पाटनवाला वय 50 वर्ष धंदा हार्डवेअर दुकानदार रा तारानगर परतवाडा ता अचलपुर | 1. मोहम्मद शाकीब वय 20 वर्ष रा छोटा बाजार परतवाडा<br>2. ज्ञानेश्वर सोनकर वय 38 वर्ष रा आझाद नगर लालपुल<br>3. इस्त्राईल खान वय 40 वर्ष रा माळीपुरा अचलपुर<br>4. हरि घोटेकार वय 37 वर्ष रा मोहन नगर परतवाडा | ईझी हार्डवेअर आठवडी बाजार परतवाडा | 16/10/2023 चे 13/22 वा | 19/10/2023 चे 19/13 वा | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी चे आठवडी आजार येथे इजी हार्डवेअर चे दुकान आहे त्या दुकानात दोन हमाल आहेत सी सी टी व्ही फुटेज वरुन 1. मोहम्मद शाकीर 2 ज्ञानेश्वर सोनकर व ऑटोवाला इसराईल खान यानी आर के वेल्डींग चे मालक हरी घोटेकर याना माल विकला व विकत घेतल्याचे कबुल केले लोखंडी पाईप व लोखंडी पत्रे बरेच दिवसापासुन चोरुन नेत आहे अदांजे एक टन लोखंडी पाईप व पत्रा कि अ 70000 रु चा माल चोरला आहे अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| 2 | खोलापूर 187/23 कलम 379 भादवी | प्रवीण रामेश्वर नागे वय 31 वर्ष रा. नावेड जि. अमरावती | विकास समाधान वानखडे वय 28 वर्श रा नांदेड | ग्राम नावेड 02 किमी पूर्व | 19/10/23 चे सकाळी 03/00 वा. ते 04/10 वा दरम्यान | 19/10/23 चे 19/49 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी फिर्यादी यांच्या शेतात पऱ्हाटीचे पिक पेरले असून त्यांच्या घरी असलेल्या बोरवेल ने पाणी देण्याकरिता चारशे फूट रबरी पाईप किंमत अंदाजे 1800/-रुपयांचा घरापासून ते शेतापर्यंत बोरवेलला लावलेला होता फिर्यादीने दिनांक 18/10/2023 रोजी सदर रबरी पाईपने पिकाला पाणी दिले पाणी देणे झाल्यानंतर मोटारीचे बटन बंद करून घरासमोर असलेल्या बंडी वर झोपले होते दुसऱ्या दिवशी उठून बोरवेल ची बटन चालू करून शेतात जात असता रस्त्याने दिसले की कोणीतरी त्यांचा रबरी पाईप कापून नेला आहे सदरचा रबरी पाईप अंदाजे दोनशे फूट किंमत 900 रुपये चा चोरून नेल्याचे दिसून आले दिनांक 19/10/23 चे रात्री 12/00 ते01/00 वाजता दरम्यान गावातील विकास वानखेडे राहणार हा फिर्यादी यांना संचयितरित्या फिरताना दिसून आला वरून त्याचे वर संशय आहे अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 3 | आसेगाव पूर्णा 273/23 कलम 341,324 भादवी | सतीश विष्णुपंत शेकोकार वय 35 वर्ष रा. निरुळगंगामाई ता.भातकुली जि. अमरावती | मोहन पुंडलिक परिसे वय 40 रा. निरुळगंगामाई | ग्राम निरुळगंगामाई 8 किमी दशिण | 19/10/23 चे 17/00 वा. ते 17/30 वा दरम्यान | 19/10/23 चे 22/06 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की नमूद घ.ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हा शेतामधून घरी जात असताना नमूद आरोपीने 407 छोटा ट्रक अडविला फिर्यादी ट्रक मधून खाली उतरला तर आरोपी याने म्हटले की तुझ्या गाडीचे काच फोडतो. फिर्यादी च्या डोक्यावर आरोपीने दगड मारला व दगड लागल्याने रक्त निघाले अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | शे घाट 394/2023 कलम 457, 380 भा द वि. | मोहम्मद इशाक मोहम्मद युनूस वय ५५ वर्ष रा. बाला सुंदरी मंदिराजवळ शेघाट | अज्ञात | महात्मा फुले कॉन्व्हेट जवळ बालापेठ शेघात १ की मी पूर्व | 18/10/2023 चे ०६/०० वा. ते १९/१०/२०२३ चे ०७/०० वा. दरम्यान | 19/10/23 चे १२/१५ वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घ ता वेळी व ठीकाणी फिर्यादीचा लहान भाऊ मोहम्मद युसुफ मोहम्मद युनूस हा बाला पेट कॉन्व्हेंट जवळ मुलाबालसह राहतो १८/१०/२३ रोजी सकाळी ०९/०० व. फिर्यादीचा लहान भाऊ त्याचे बहिणीची तब्येत खराब झाल्याने नागपूर येथे घेऊन त्याची मुलगी आयशा मोहम्मद युनूस वय १८ वर्ष ही दिवसभर घरी होती सायंकाळी सहा वाजता गेटला कुलूप लावून फिर्यादीकडे मुक्कामाकरिता आली आज दिनांक १९/१०/२०२३ रोजी सकाळी पाणी भरण्याकरिता गेली तिला तिचे गेटला कुलूप दिसले नाही त्यामुळे तिने लगेच फिर्यादी यांना फोन करून माहिती दिली फिर्यादीने लगेच त्याच्या भावाच्या घरी जाऊन पाहिले असता प्रवेश दाराचा कुलूप कोंडा तुटलेला दिसला दार लोटून आत मध्ये प्रवेश केला असता हॉलचे नंतरचे खोलीमध्ये नंतरचे कपाट तुटलेले दिसले फिर्यादीचे पुतणीने कपाट ची पाहणी केली असता ६००००रू नगदी एक १० ग्राम सोन्याची पोत, १० ग्राम सोन्याचे मंगळसूत्र ४ ग्राम तीन जोड कानातले, १ ग्राम बारा सोन्याचे मनी, १ ग्राम लहान मुलीचे कानातले, २ तोले चांदीचे चार पायल असे एकूण 37 ग्राम जुने वापरते सोन्याचे दागिने किंमत अं. ९५५०० रू.८० ग्राम चांदीचे पायल किंमत अंदाजे ५००० रू. नगदी ६०००० रू. असा एकूण १५७५०० रू रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरट्याने घराचे वॉल कंपाऊंड तोडून चोरून नेला अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून रिपोर्ट सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 5 | बेनोडा 225/23 कलम 324,323, 504,506, 34 ipc | सुरज सिताराम शिंदे वय 40 वर वर्ष रा. शिंगोरी | 1.सुरज खंगार वय 25 वर्ष रा. नटाळा, 2. चंद्रभान खंगार वय 36 वर्ष रा. शिंगोरी | ग्राम शिंगोरी 15 किमी दक्षीण | 18/10/23 चे 23.00 वा दरम्यान | 19/10/23 चे 17.24 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमूद घटना तारीख वेळ व ठिकाणी यातील फिर्यादी चुलत भाचा हा गावात लोकांना जुगाराचा खेळ खेळत असतांना हटकले असता तेथे वरील नमुद आरोपीतांनी आरोपी क. 1 व 2 यांनी शिवीगाळ लाथा बुक्क्यांनी मारहाण केली तसेच फिर्यादीची चुलत बहीण हे भांडण सोडविण्याकरिता गेली असता आरोपी यांनी छातीला वीट मारली त्यामुळे ती जख्मी केले.अशा जबीनी रिपोर्ट व मेडीसर्टी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 6 | मोर्शी 508/23 कलम.324, 504,506, 34 भादवी | युगांत हरिभाऊ पाटील वय 36 वर्ष धंदा शेतमजुरी राहणार घाटलाडकी तालुका चांदुर बाजार हल्ली मुक्काम सुनीता सुनील घोरमाडे यांचे घरी मालवीय गार्डन तालुका मोर्शी जिल्हा अमरावती | 1) शेषराव मुसाजी उडणारे वय 35 वर्ष राहणार बालाजी नगर मोर्शी 2) पुस्तक शेषराव उगणारे | आरोपी येथे राहत्या घरासमोर बालाजी नगर मोर्शी दक्षिण 2किमी | 19/10/2023 चे 15/05 वा .दरम्यान | 19/10/2023 चे 17/ 38 | हकीकत अशाप्रकारे आहे की आरोपी व फी हे नातेवाईक असून यातील फी याचे आरोपी यांनी उसने तीन लाख रुपये पैसे घेतले होते तर आज दिनांक 19 10 23 रोजी दुपारी दोन वाजता फी व त्याची आई असे त्याचे मामा शेषराव उगणारे याचे घरासमोर पैसे मागण्याकरिता गेलो असता नमूद आरोपी यांनी म्हटले की तुझ्याजवळ काही लेखी लिहिलेले नाहीये मी तुझे पैसे देणार नाही तुझ्याकडून जे होते ते करून घे असे म्हणून शिवीगाळ केली फी याचा मावस भाऊ पुष्पक शेषा उडणारे व 28 वर्ष हा घरातून काठी घेऊन बाहेर आला व त्याने माझ्यासोबत काही न बोलता माझे मागून येऊन माझे डोक्याचे उजवे बाजूला त्याचे हातातील काठीने मारहाण केली म्हणून मी घडलेल्या घटनेचा रिपोर्ट देण्याकरिता पोलीस स्टेशनला आलेला आहे कार्यवाही व्हावे अशा जबीनी रिपोर्ट व मेडीसर्टी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 7 | कु-हा 338/23 कलम 379 भादवी | अमन महादेव शाहू वय 31 वर्ष रा. कारला जि. अमरावती | अज्ञात | ग्राम कौंडण्यपूर अंबिका माता मंदिर मंदिर 10 किमी पूर्व | 18/10/23 चे सकाळी 07/15 वा. ते | 19/10/23 चे 16/07 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की नमूद घ.ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हा कौंडण्यपूर येथे दर्शनाला गेले असता अंबिका मंदिराच्या बाजूला अशोकाच्या झाडाजवळ लॉक न करता उभी ठेवलेली मोसा क्रमांक MH-32-L-9238 ची किंमत अंदाजे 10,000/- रू ची कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे अशा फिर्यादीच्या |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 08/45 वा दरम्यान | | जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 8 | अंजनगाव सुर्जी 644/23 कलम 380 भादवी | तुळशीदास भाऊरावजी गोळे वय 52 वर्ष रा. हंतोडा, तालुका अंजनगाव सुर्जी जि. अमरावती | अज्ञात | ग्राम , हंतोडा फिर्यादीचे राहते घर तालुका अंजनगाव सुर्जी | 19/10/23 चे रात्री 12/30 वा. ते 05/30 वा दरम्यान | 19/10/23 चे 18/26 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी यांचे राहते घरामध्ये ठेवलेल्या 56 सोयाबीन कट्ट्या पैकी 4 सोयाबीनचे कट्टे अंदाजे 2 क्विंटल किंमत अंदाजे 4500 रुपये प्रति क्विंटल असा एकूण 9000 रुपयाचा माल कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी रात्री दरम्यान चोरून नेला अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 9 | पथ्रोट 333 / 2023 कलम 452, 323, 504, 506,34 भादवी | सौ महिला वय 25 वर्ष, | 1) रोशन बाबुलाल नागापुरे 2) दिपक बाबुलाल नागापुरे 3) अनील मस्करे 4) सौ. महिला वय- ३५ वर्ष सर्व रा. रामापुर पथ्रोट | तेलंखडी, पथ्रोट | 19/10/23 चे 19/00 वा. दरम्यान | 19/10/23 चे 21/27 वा | हकीकत अशाप्रकारे आहे की, नंमुद घता वेळी व ठिकाणी फि ही तीचे घराची झाडझूळ करीत असतांना तेथे आरोपी क्र 2 आला व फिर्यादीस शिवीगाळ करू लागला तेथे फि च्या पतीने येऊन त्यास समजावले असता त्याने फि चे पतीस व फि ला शीवीगाळ केली व तेथुन निघुन गेला. नमुद घ ता. वे ळी व ठिकाणी फि चे पती व सासु-सासरे असे घरी हजर असतांना नमुद आरोपी फि च्या घरात आले व फि च्या पतीस म्हणाले की, तु दिपकला आठ दिवसापुर्वी का बोलला असे बोलून फि च्या पतीला लाथा बुक्कयानी मारहाण करु लागले. वरुन फि व फि चे जेठ असे त्यांचे भांडण सोडवीण्यास गेले तर त्यांना सुध्दा लाथाबुक्यांनी मारहाण केली व शीवीगाळ करुन जीवाने मारण्याची धमकी दिली. अश्या फिर्यादीचे जबांनी रिपोर्ट व मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला, |

पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण

करीता